पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

# विद्यार्थी परिषद

## शैै. वर्ष २०१७–१८

# वार्षिक अहवाल

प्राचार्य

डॉ. एस.आर.टकले

प्र. प्राध्यापक

प्रा. डॉ. सुरेश मुंढे

पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

# विद्यार्थी परिषद

## शै. वर्ष २०१७–१८

# वार्षिक अहवाल

विद्यार्थी परिषदेच्या वतीने नियोजित घेतलेले कार्यक्रम

अनुक्रमणिका


| अ.क्र. | नियोजित कार्यक्रम | पेज. नं. |
|---|---|---|
| १ | गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार | 1 - 2 |
| २ | प्रतिनिधी व सचिव निवड प्रक्रिया | 02 |
| ३ | सावता भूषण पुरस्कार निवड प्रक्रिया | 03 |
| ४ | वार्षिक स्नेहसंमेलन | 03 |
| ५ | वर्तमान पत्रातील दखल | 5 - 6 |
| ६ | कार्यक्रमाचे क्षणचित्रे | 8 - 9 |

**१) विद्यार्थी परिषदेची उद्दिष्ट्ये:—**

१) विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी महाविद्यालयात विद्यार्थी संसदेची स्थापना करणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन करण्याचे गुण विकसित करणे.

३) विविध कार्यक्रमाच्या आयोजनातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित करण्यास संधी देणे.

४) विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना चालना देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजित करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती निर्माण करणे.

७) विद्यार्थ्यांमध्ये मुल्य संवर्धन निर्माण करणे.

८) विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी प्रोत्साहनपर विविध बक्षिस व पुरस्कार योजना

राबविणे

९) विद्यार्थ्यांना भविष्यातील एक सुजाण नागरिक घडविणे.

**२) विद्यार्थी परिषदेची कार्ये:—**

१) विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक करणे.

२) महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.

३) वार्षिक स्नेहसंमेलन आयोजन करणे.

४) गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करणे.

५) महाविद्यालयाच्या बाहेरील विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे.

१) गुणवंत विद्यार्थी सत्कार :–

प्रतिवर्षी प्रमाणे विद्यार्थी परिषद समिती मार्फत शै. वर्ष २०१६–१७ मधील बी.ए., बी. कॉम व १२ वी मध्ये परिसरातील प्रथम, द्वितीय आलेल्या गुणवंतांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे म्हणून मा. प्रा. यजुर्वेंद्र महाजन (संस्थापक, दीपस्तंभ फाऊंडेशन,जळगाव ) हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव मा. श्री शामराव नाईक व प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले. या कार्यक्रमात एकूण ४७ विद्यार्थ्यांचा पुष्प व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. त्यामध्ये २५ मुले व २२ मुलींचा सहभाग होता. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

२) प्रतिनिधी व सचिव निवड प्रक्रिया :–

दिनांक २२ फेब्रुवारी २०१८ रोजी च्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१७ कलम (९९अ) अंतर्गत शै. वर्ष २०१७–१८ करिता महाविद्यालयीन विद्यार्थी परिषद गठीत करण्यात आली ती खालीलप्रमाणे व निवडलेल्या प्रतिनिधीमधून लक्ष्मीकांत कारभारी ढेपले यांची बिनविरोध सचिव पदी निवड करण्यात आली व सर्व अधिकार महाविद्यालयाकडे ठेवण्यात आले.

| अ.क्र. | वर्ग/ विभाग | प्रतिनिधी नाव |
|---|---|---|
| १ | बी. ए. प्रथम वर्ष | तुपे नंदु विठ्ठल |
| २ | बी. ए. द्वितीय वर्ष | देवकुळे प्रमोद विनायक |
| ३ | बी. ए. तृतीय वर्ष | मलये कल्याणी सुशिल |
| ४ | बी. कॉम. प्रथम वर्ष | बेडके नंदा रावसाहेब |
| ५ | बी. कॉम. द्वितीय वर्ष | ढेपले लक्ष्मीकांत कारभारी |
| ६ | बी. कॉम. तृतीय वर्ष | बेदरकर आरती दिलीप |
| ७ | बी. एस्सी. प्रथम वर्ष | कापडे ज्योती संजय |
| ८ | राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन शिक्षण व विस्तार विभाग | धनावत गजानन गोविंदसिंग |
| ९ | सांस्कृतिक विभाग | नाईक शुभम संजय |
| १० | क्रिडा विभाग | जाधव शिवम भास्कर |
| ११ | महिला प्रतिनिधी | १) उदे ज्योती रमेश<br>२) मिसाळ स्वाती प्रमोद |

३) <u>सावता भूषण पुरस्कार निवड प्रक्रिया</u> :–

महाविद्यालयाच्या वतीने बी.ए. व बी.कॉम. मधील तृतीय वर्षाच्या एका विद्यार्थ्याला पुरस्कारासाठी लागू असलेल्या नियम व अटींच्या अधीन राहून हा पुरस्कार दिला जातो. या संबंधी दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्याकडून अर्ज मागविण्यात येणारी सूचना लावण्यात आली व १९ तारीखेपर्यंतची विद्यार्थ्यांना मुदत देण्यात आली.

दिनांक १९ जानेवारी २०१८ पर्यंत एकूण ३ विद्यार्थीनीचे अर्ज प्राप्त आले त्यासंबंधी दि. १९ जानेवारी दुपारी ३ वाजेच्यानंतर प्राचार्य कक्षात महाविद्यालयीन स्तरावर सावताभूषण पुरस्कारसाठी तयार केलेल्या समितीची बैठक बोलावून त्यामध्ये आलेल्या अर्जावर समितीमार्फत मुल्यांकन करून गुणांकन देण्यात आले व त्यानुसार सर्वात जास्त गुण बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थीनी कु. प्रियंका शेषराव गायकवाड या विद्यार्थीनीला शै. वर्ष २०१७–१८ चा सावताभूषण पुरस्कार देण्याचा ठराव घेण्यात आला.

४) <u>वार्षिक स्नेहसंमेलन</u> :–

शै. वर्ष २०१७–१८ चे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २३ ते २५ जानेवारी २०१८ दरम्यान आयोजित करण्यात आले. दिनांक २३ जानेवारी २०१८ रोजी सांयकाळी ५ वाजता मा. डॉ. केशव तुपे ( सहसंचालक, उच्च शिक्षण जळगाव विभाग, जळगाव) यांच्या उपस्थितीत व संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले. दिनांक २३ जानेवारी २०१८ रोजी सकाळी विद्यार्थ्यासाठी क्रिडा स्पर्धा, काव्यवाचन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्वा स्पर्धा, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. जसेच दिनांक २४ जानेवारी २०१८ रोजी सांयकाळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध धार्मिक, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले.

दिनांक २५ जानेवारी २०१८ रोजी समारोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. योगिता होके पाटील (संचालिका, वसंतदादा पाटील प्रतिष्ठाण, माजलगाव) व रवि काथार (सदस्य, महाविद्यालय विकास समिती ) हे होते तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. एस. आर. टकले सर होते. या समारोप समारंभात स्नेहसंमेलना निमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील प्रथम, द्वितीय विजेत्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र व पुस्तक भेट देण्यात आले.

तसेच शै. वर्ष २०१७–१८ मधील सावता भूषण पुरस्काराचे वितरण या समारोप समारंभात करण्यात आले. या पुरस्काराचे मानपत्र वाचन प्रा. डॉ. सुरेश गुट्टे यांनी केले. या प्रसंगी सावता भूषण हा पुरस्कार कु. प्रियंका शेषराव गायकवाड या बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थीनीला मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला. या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

वर्तमान पत्रातील दखल

दै. दिव्य मराठी - 08/08/2017

## फुलंब्रीत आज गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी | फुलंब्री

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात तालुक्यातील इयत्ता १२ वीमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११:३० ला दीपस्तंभ फाउंडेशन जळगावचे संस्थापक प्रा. यजुर्वेंद्र महाजन यांच्या हस्ते ठेवण्यात आला आहे. अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ शिक्षण संस्थेचे सचिव शामसुंदर नाईक तर डॉ. सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती असणार आहे. त्यामुळे फुलंब्री तालुक्यातील इयत्ता १२ वीमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा.

दिव्य मराठी विशेष | प्रा. यजुर्वेंद्र महाजन यांचे फुलंब्रीतील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात प्रतिपादन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## आदर्श विचार आणि कृती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देते

प्रतिनिधी | फुलंब्री

[illegible]



[illegible] यजुर्वेंद्र महाजन, सर्जेराव ठोंबरे, एस. आर. तायडे, ज्ञानेश्वर [illegible].

[illegible]

वर्तमान पत्रातील दखल

# विचार अन् कृतीतून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ - प्रा. यजुर्वेंद्र महाजन

दै. पुण्यनगरी - 10.08.2017

फुलंब्री/ प्रतिनिधी

आयुष्यात जे काही मिळवायचे ते मिळविण्यासाठी अथक प्रयत्न घेतला पाहिजे. एकदा मनात गोष्ट ठामपणे ठरवली की ती पूर्ण करण्यासाठी चिकाटीने परिश्रम केले पाहिजे. विचार आणि कृती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देत असतात, यासाठी सातत्याने वाचन आणि विचारमंथन करणे गरजेचे आहे, असा सल्ला वळगाव नेशील दीपस्तंभ फाऊंडेशनचे प्रा. यजुर्वेंद्र महाजन यांनी विद्यार्थ्यांना दिला.

श्री.संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या वतीने फुलंब्री तालुक्यातील इयत्ता बारावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रथम व द्वितीय क्रमांक संपादन केलेल्या ५२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रा.महाजन यांच्या हस्ते करण्यात आला. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थित होती. पुढे प्रा. महाजन म्हणाले की, समाजातील अपंग, आश्रित, अंध, अनाथ, गरीब मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे आमचे दीपस्तंभ फाऊंडेशन आहे. अशा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करता आला पाहिजे. त्यासाठी सर्वप्रथम त्यांच्या मनातील भीती काढून टाकण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यावेळी समाजशास्त्र विषयात प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या ईश्वरी दिलीप काथार हिचा धुराजी खोतकर पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांची १२५ वी जयंतीनिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी ग्रंथालयास त्यांची पुस्तके भेट दिली.

अध्यक्षीय समारोप डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी केला. प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. अश्विन रांजणीकर व डॉ. मंजूषा नळगीरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुरेश मुंढे व डॉ. मंजूषा नळगीरकर यांनी परिश्रम घेतले.



श्री संत सावता माळी महाविद्यालयात कार्यक्रमाचे उद्घाटन करताना प्रा. महाजन.

गुणवंत विद्यार्थी सत्कार प्रसंगी उपस्थित विद्यार्थी व मान्यवर



# कार्यक्रमाचे क्षणचित्रे



वार्षिक अंकाचे प्रकाशन करताना मान्यवर




वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोप प्रसंगी बोलताना डॉ. मोहिता प

## कार्यक्रमाचे क्षणचित्रे




सबला भूषण प्रदान करताना विद्यार्थीनी व मान्यवर प्राध्यापक



विविध स्पर्धामध्ये स्नेहसंमेलनात मिळालेल्या प्रमाणपत्रासह विद्यार्थी